# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत )

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

क्र.मऔविम/भूविभाग/ B80911 दिनांक : 31/05/2019

## परिपत्रक

**विषय :- महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील भूखंड विकसित करण्यासाठी मुदतवाढी संदर्भात विशेष मुदतवाढ योजना लागू करणेबाबत..**

महामंडळाने विकसित केलेल्या औद्योगिक क्षेत्रात भूखंडधारकांना त्यांना लागू असलेला विकास कालावधी संपल्यानंतर दिनांक ०६.०३.२०१३ च्या परिपत्रकानुसार विशेष मुदतवाढ योजनेअंतर्गत पहिली व दुसरी मुदतवाढ तसेच दिनांक ०३.११.२०१७ च्या परिपत्रकानुसार तिसरी व चौथी मुदतवाढ अनुज्ञेय करण्यात आलेली आहे. महामंडळाच्या दिनांक २१.१०.२०१५ च्या परिपत्रकानुसार विशेष मुदतवाढ योजना, तसेच दिनांक २३.१०.२०१५, १४.०३.२०१६, ०६.०९.२०१६ च्या परिपत्रकानुसार भूखंडधारकांना उद्योग संजीवनी योजना लागू करण्यात आली होती. उपरोक्त मुदतवाढी/योजनेचा लाभ घेवून मंजूर नकाशे/ नकाशे मंजूर न करता बांधकाम पूर्ण केलेले आहे व भूखंडधारक उत्पादनात गेलेला आहे किंवा उत्पादनात जावून सद्यःस्थितीत उत्पादन बंद आहे, अशा औद्योगिक, व्यापारी, निवासी तसेच प्राधान्य सदराखाली व उद्योग विस्तारासाठी वाटप केलेल्या सर्व प्रकारच्या भूखंडांसाठी इमारत पूर्णत्वाचा दाखला प्राप्त करण्यासाठी मुदतवाढीची आवश्यकता असल्याने प्रकरणी विशेष मुदतवाढ योजना लागू करणे आवश्यक असल्याचे संचालक मंडळाच्या दिनांक २८.१२.२०१८ रोजी झालेल्या ३७८ व्या बैठकीत निदर्शनास आणूण देण्यात आले. महामंडळाव्दारे वेळोवेळी मुदतवाढीसाठी परिपत्रके काढून भूखंडधारकांना भूखंड विकासासाठी सूट देण्यात आल्यानंतरसुध्दा भूखंडधारकाव्दारे भूखंडाचा विकास करण्यात येत नाही, अशा भूखंडधारकांना मुदतवाढ देण्यात येऊ नये. याबाबत भूखंड वाटपाच्या वेळेसच भूखंडधारकास जमीन घेवून ठेवण्याच्या प्रवृतीस आळा बसेल या दृष्टीने महामंडळाने कार्यवाही करावी. याबाबत संचालक मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा होवून ठराव क्र. ५८३७ पारीत करण्यात आला. सदरहू ठरावाच्या अनुषंगाने, भूखंड विकसित करण्यासाठी खालीलप्रमाणे विशेष मुदतवाढ योजना क्र.२ निर्गमित करण्यात येत आहे.

I. विशेष मुदतवाढ योजना क्र २, दिनांक ३१.०८.२०१९ पर्यन्त राबविण्यास मंजूरी देण्यात येत आहे. त्यानुसार मुदतवाढ खालील नमूद तक्त्याप्रमाणे अनुज्ञेय करण्यात यावी.

## अ) दिनांक ३१.८.२०१३ पूर्वी मूदतवाढ संपलेल्या भूखंडांसदर्भात मुदतवाढ शुल्क :-

**(प्रतिवर्षी प्रचलित दरांच्या)**

| मुदतवाढ | मंजूर नकाशे प्रमाणे बांधकाम पूर्ण , उत्पादन सुरु केले आहे व आजही उत्पादन सुरु आहे | | मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम पूर्ण , उत्पादन सुरु झाले व सद्यःस्थितीत उत्पादन बंद आहे | | नकाशे मंजूरी न करता बांधकाम पूर्ण व उत्पादन सुरु | | नकाशा मंजूरी न करता बांधकाम पूर्ण / अर्धवट मात्र उत्पादनात नाही/भूखंड मोकळा आहे. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ/ब/क | ड/ड+ | अ/ब/क | ड/ड+ | अ/ब/क | ड/ड+ | अ/ब/क | ड/ड+ |
| दि. ३१.०८.२०१३ पूर्वीच्या कालावधीसाठी प्रतीवर्षी प्रचलित दरांच्या | ५% | ५% | ५% | ५% | ५% | ५% | भूखंड काढून घेणेत यावा व मुदतवाढ शुल्काइतक्या दंडाची आकारणी करावी. | |
| प्रथम | २५% | १०% | २५% | १०% | २५% | १०% | | |
| व्दितीय | ४०% | १०% | ४०% | १०% | ४०% | १०% | | |
| तिसरी | ५% | ५% | ५% | ५% | ५% | ५% | | |
| चौथी | ५% | ५% | ५% | ५% | ५% | ५% | | |
| पाचवी | ५% | ५% | ५% | ५% | १०% | १०% | | |
| सहावी | ५% | ५% | ५% | ५% | १०% | १०% | | |
| | उत्पादन दिनांकापर्यन्त मुदतवाढ शुल्क घ्यावे. | | दि. ०८.९.२०१५ च्या परिपत्रकानुसार मुदतवाढ. कंपनी बंद असण्याच्या कालावधीत मुदतवाढ शुल्क परिगणीत करुन त्याच्या ५० टक्के शुल्क आकारावे. | | विनापरवानगी बांधकाम संदर्भात दंडणीय शुल्क आकारावे. उत्पादन दिनांक विचारात न घेता BCC पर्यन्त शुल्क आकारावे. | | | |

## ब)दिनांक ३१.०८.२०१३ रोजी तसेच त्यानंतर मुदतवाढ संपलेल्या भूखंडासंदर्भात मुदतवाढ शुल्क-

**(प्रतिवर्षी प्रचलित दरांच्या)**

| मुदतवाढ | मंजूर नकाशे प्रमाणे बांधकाम पूर्ण , उत्पादन सुरु केले आहे व आजही उत्पादन सुरु आहे | | मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम पूर्ण , उत्पादन सुरु झाले व सद्यःस्थितीत उत्पादन बंद आहे | | नकाशे मंजूरी न करता बांधकाम पूर्ण व उत्पादन सुरु | | नकाशा मंजूरी न करता बांधकाम पूर्ण, मात्र उत्पादनात नाही/ भूखंड मोकळा आहे. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ/ब/क | ड/ड+ | अ/ब/क | ड/ड+ | अ/ब/क | ड/ड+ | अ/ब/क | ड/ड+ |
| प्रथम | २५% | १०% | २५% | १०% | २५% | १०% | भूखंड काढून घेणेत यावा व मुदतवाढ शुल्काइतक्या दंडाची आकारणी करावी. | |
| व्दितीय | ४०% | १०% | ४०% | १०% | ४०% | १०% | | |
| तिसरी | ५% | ५% | ५% | ५% | ५% | ५% | | |
| चौथी | ५% | ५% | ५% | ५% | ५% | ५% | | |
| पाचवी | ५% | ५% | ५% | ५% | १०% | १०% | | |
| सहावी | ५% | ५% | ५% | ५% | १०% | १०% | | |
| | उत्पादन दिनांकापर्यन्त मुदतवाढ शुल्क घ्यावे. | | ०८.९.२०१५ च्या परिपत्रकानुसार मुदतवाढ. कंपनी बंद असण्याच्या कालावधीत उपरोक्त नमूद प्रमाणे मुदतवाढ शुल्क परिगणीत करुन त्याच्या ५० टक्के शुल्क आकारावे. | | विनापरवानगी बांधकाम संदर्भात दंडणीय शुल्क आकारावे. उत्पादन दिनांक विचारात न घेता BCC पर्यन्त शुल्क आकारावे. | | | |

क) उद्योग संजीवनी योजनेत भाग घेतलेल्या भूखंडाना विनाशुल्क मुदतवाढ देण्यात आलेल्या अंतिम दिनांकापासून पुढील अनुज्ञेय मुदतवाढी दिनांक ३१.०८.२०१९ पर्यन्तच लागू राहतील.

ड) उद्योग विस्तार / प्राधान्य सदराखाली वाटप भूखंडांबाबत सर्व प्रभागासाठी खालीलप्रमाणे मुदतवाढी अनुज्ञेय करण्यात येत आहेत.

| मुदतवाढ | मंजूर नकाशे प्रमाणे बांधकाम पूर्ण , उत्पादन सुरु केले आहे व आजही उत्पादन सुरु आहे | | मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम पूर्ण , उत्पादन सुरु झाले व सद्य:स्थितीत उत्पादन बंद आहे | | नकाशे मंजूरी न करता बांधकाम पूर्ण व उत्पादन सुरु | | नकाशा मंजूरी न करता बांधकाम पूर्ण, मात्र उत्पादनात नाही / भूखंड मोकळा आहे.. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ/ब/क | ड/ड+ | अ/ब/क | ड/ड+ | अ/ब/क | ड/ड+ | अ/ब/क | ड/ड+ |
| प्रथम | २५% | २५% | २५% | २५% | २५% | २५% | भूखंड काढून घेणेत यावा व मुदतवाढ शुल्काइतक्या दंडाची आकारणी करावी. | |
| व्दितीय | ५०% | ५०% | ५०% | ५०% | ५०% | ५०% | | |
| तिसरी | ५% | ५% | ५% | ५% | ५% | ५% | | |
| चौथी | ५% | ५% | ५% | ५% | ५% | ५% | | |
| पाचवी | ५% | ५% | ५% | ५% | १०% | १०% | | |
| सहावी | ५% | ५% | ५% | ५% | १०% | १०% | | |
| | उत्पादन दिनांकापर्यन्त मुदतवाढ शुल्क घ्यावे. | | दि. ०८.९.२०१५ च्या परिपत्रकानुसार मुदतवाढ. कंपनी बंद असण्याच्या कालावधीत उपरोक्त नमूद प्रमाणे मुदतवाढ शुल्क परिगणीत करुन त्याच्या ५० टक्के शुल्क आकारावे. | | विनापरवानगी बांधकाम संदर्भात दंडणीय शुल्क आकारावे. उत्पादन दिनांक विचारात न घेता BCC पर्यन्त शुल्क आकारावे. | | | |

इ) ज्या भूखंडांवर बांधकाम पूर्ण असून उत्पादन सुरु झाले/आहे, अशाच भूखंडांसाठी पाचवी व त्यापुढील मुदतवाढीबाबतचा निर्णय सक्षम प्राधिका-यांनी गुणवत्तेनुसार घ्यावा.

ई) मुदतवाढीसंदर्भात महामंडळाच्या यापूर्वीच्या दिनांक ०६.०३.२०१३ परिपत्रकातील परिच्छेद "क" मधील प्रकरणनिहाय्य लागू होणारे मुद्दे व दिनांक ०३.११.२०१७ च्या परिपत्रकातील खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

१. भूखंड विकासासाठी केलेली परिणामकारक कार्यवाही आणि नकाशे मंजूरीनुसार किमान ५० टक्के बांधकाम झाले असल्यास(बांधकामाच्या प्रगतीबाबत विशेष नियोजन प्राधिकारी/प्रादेशिक अधिकारी यांचा स्थळपाहणीचा वस्तुनिष्ठ अहवाल